<u>**भुसंपादन अर्ज क्र. ३६/२०१९ मधील निशाणी २८ वरील आदेश**</u>

(दिनांक २८/०३/२०२२)

१. अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार नं. ६(३) सुनिल शिवाजी पाटील हे दिनांक ०९/०७/२०२० रोजी मयत झाले आहेत. अर्जदार यांचे वारसाना कायद्याचे ज्ञान नसल्याने तसेच दरम्यानच्या काळात कोवीडच्या साथीमुळे अर्जदार यांचे वारसाना मयत अर्जदार चे वारस मुदतीत अभिलेखावर आणता आले नाहीत. त्यामुळे अर्जदार यांच्या विरुध्द सदरचा अर्ज अबेट झाला आहे. त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे. प्रस्तुत अर्जावर जाबदार यांनी नि.३३ कडे आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जाचे स्वरुप विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज भूसंपादनाची रक्कम वाढवुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. अर्जामध्ये अर्जदार तसेच जाबदार यांचे हक्क व हितसंबंध असल्याचे दिसुन येते. मयत अर्जदार यांचे वारस या कामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यांच्याशिवाय वाद विषयाचे समुळ निराकरण होणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

<u>**आदेश**</u>

१. अर्जदार नं. ६(३) सुनिल शिवाजी पाटील यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

(भूषण र. ठाकूर)

दिनांकः– २८/०३/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.

## भुसंपादन अर्ज क्र. ३६/२०१९ मधील निशाणी २९ वरील आदेश
(दिनांक २८/०३/२०२२)

१. अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार नं. ६(३) सुनिल शिवाजी पाटील हे दिनांक ०९/०७/२०२० रोजी मयत झाले आहेत. अर्जदार यांचे वारसाना कायद्याचे ज्ञान नसल्याने तसेच दरम्यानच्या काळात कोवीडच्या साथीमुळे अर्जदार यांचे वारसाना मयत अर्जदार चे वारस मुदतीत अभिलेखावर आणता आले नाहीत. त्यामुळे अर्जदार यांच्या विरुध्द सदरचा अर्ज अबेट झाला आहे. सदरचा अबेटमेंट चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे. प्रस्तुत अर्जावर जाबदार यांनी नि.३३ कडे आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जाचे स्वरुप विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज भूसंपादनाची रक्कम वाढवुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. अर्जामध्ये अर्जदार तसेच जाबदार यांचे हक्क व हितसंबंध असल्याचे दिसुन येते. मयत अर्जदार यांचे वारस या कामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यांच्याशिवाय वाद विषयाचे समुळ निराकरण होणार नाही. त्यामुळे गुंतागुंत टाळण्याकरीता मयत अर्जदार यांचे वारसांना या कामी सामील करणे आवश्यक आहे. सबब, आदेश.

## आदेश

१. अर्ज मंजुर.
२. अर्जदार विरुद्धचा अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

(भूषण र. ठाकूर)

दिनांकः– २८/०३/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.

<u>**भुसंपादन अर्ज क्र. ३६/२०१९ मधील निशाणी ३० वरील आदेश**</u>

(दिनांक २८/०३/२०२२)

१. अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार नं. ६(३) सुनिल शिवाजी पाटील हे दिनांक ०९/०७/२०२० रोजी मयत झाले आहेत. सदर अर्जदार यांना अर्जात नमुद केल्याप्रमाणे श्रीमती अनिता सुनिल पाटील व कु. नितीन सुनिल पाटील असे वारस आहेत. त्यामुळे त्यांना अर्जदार यांचे वारस म्हणुन अर्जात सामील करुन घेणेस परवानगी मिळण्यासाठी केला आहे. प्रस्तुत अर्जावर जाबदार यांनी नि.३३ कडे आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. अर्जातील कथने व अभिलेखाचे अवलोकन केल्यास अर्जदार हे ता. ०९/०७/२०२० रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. अर्जदार यांच्या कथनानुसार मयत अर्जदार यांना अर्जात नमुद केलेप्रमाणे वारस आहेत. त्यांचे वारस अभिलेखावर घेतल्यास प्रकरणाचे कामकाज गुणदोषावर चालून निकाली करण्यास मदत होणार आहे. भविष्यातील दावे प्रतिदावे टाळण्यासाठी सदर दुरुस्ती आवश्यक आहे. त्यामुळे अर्जाच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सबब, आदेश.

<u>**आदेश**</u>

१. अर्ज मंजुर.

२. अर्जात नमुद केलेप्रमाणे वादी दाव्यात करु इच्छीत असलेली दुरुस्ती त्यांनी आदेशाच्या दिनांकापासुन १४ दिवसांत करावी व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करुन प्रतिवादींना देखील पुरवावी.

३. अर्जाचा खर्च वादीनी सोसावा.

सही/-

(भूषण र. ठाकूर)

दिनांकः- २८/०३/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.